# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

**मराठी विभाग**

लोकमत पुणे, मंगळवार, दि. २ जानेवारी २०१८




हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. संदीप सांगळे.

### संधी आणि वर्तमानाचा विचार मराठीत व्हायला हवा : सांगळे

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : मराठी म्हणजे साहित्य किंवा संस्कार असा दृष्टिकोन न ठेवता वर्तमानाचा विचार करून संधी खुल्या करणारे विषय मराठीच्या अभ्यासक्रमात असायला हवेत, तरच मराठीचा गांभीर्याने अभ्यास करणारे विद्यार्थी तयार होतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य पत्रिका संपादन मंडळाचे सदस्य आणि [illegible] महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. संदीप सांगळे यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'मराठीतील संधी' या विषयावर बोलत होते.

या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे आणि मराठीचा विशेष स्तरावर अभ्यास करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

सांगळे म्हणाले, मराठीचा अभ्यासक्रम कालानुरूप अधिक व्यावहारिक व उपयोजित व्हायला हवा. कारण पटकथालेखन, अनुवाद कौशल्य, प्रसारमाध्यमातील संधी, सूत्रसंचालन व भाषा, मुद्रितशोधन, निवेदन, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत संधी निर्माण झाल्या आहेत.

सकाळ
पुणे, शुक्रवार
५ जानेवारी २०१८
३

### 'मराठीचा अभ्यासक्रम काळानुरूप व्हावा'

राजगुरुनगर, ता. ४ : ''मराठी म्हणजे फक्त साहित्य किंवा संस्कार असा दृष्टिकोन न ठेवता, मराठीचा अभ्यासक्रम काळानुरूप अधिक व्यावहारिक व उपयोजित व्हायला हवा,'' अशी अपेक्षा महाराष्ट्र साहित्य पत्रिका संपादन मंडळाचे सदस्य डॉ. संदीप सांगळे यांनी व्यक्त केली.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'मराठीतील संधी' या विषयावर बोलत होते. या प्रसंगी कला शाखेचे उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे आणि मराठीचा विशेष स्तरावर अभ्यास करणारे विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. सांगळे म्हणाले, ''पटकथालेखन, अनुवाद कौशल्य, प्रसार माध्यमातील संधी, सूत्रसंचालन व भाषा, मुद्रितशोधन, निवेदन, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत संधी आहेत. विद्यार्थ्यांनी या नवनव्या संधींमधून आपल्या शिक्षणाचे बीज करता यायला हवे. म्हणून वर्तमानाचा विचार करून संधी खुल्या करणारे विषय मराठीच्या अभ्यासक्रमात असायला हवेत, तरच मराठीचा गांभीर्याने अभ्यास करणारे विद्यार्थी तयार होतील.''

''मोबाईलच्या नकारात्मक बाजूंचा विचार न करता भविष्यात मोबाईल हाच वही, पेन, पुस्तक असणार आहे, हे समजून घ्या. शिक्षणाचे परिवर्तन होते हे लक्षात घेऊन आपल्या आवडीच्या विषयात झोकून देऊन काम करा. ग्रंथालय व पुस्तक यांना मित्र करून विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कार जोपासा,'' असे आवाहनही त्यांनी केले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी. डी. अनुसे यांनी आभार मानले.

पुणे जिल्हा उत्तर ७ पुढारी | पुणे, मंगळवार २ जानेवारी २०१८



राजगुरुनगर येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. संदीप सांगळे.

## 'संधी, वर्तमानाचा विचार मराठीत व्हावा'

राजगुरुनगर : मराठी म्हणजे साहित्य किंवा संस्कार असा दृष्टिकोन न ठेवता विविध संधी खुल्या करणारे विषय मराठीच्या अभ्यासक्रमात असायला हवेत, तरच मराठीचा गांभीर्याने अभ्यास करणारे विद्यार्थी तयार होतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्यपत्रिका संपादन मंडळाचे सदस्य आणि तळेगाव दाभाडे महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख डॉ. संदीप सांगळे यांनी केले. राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी 'मराठीतील संधी' या विषयावर डॉ. सांगळे बोलत होते. डॉ. सांगळे या वेळी म्हणाले की, मराठीचा अभ्यासक्रम काळानुरूप अधिक व्यावहारिक व उपयोजित व्हायला हवा. कारण पटकथालेखन, अनुवाद कौशल्य, प्रसारमाध्यमांतील संधी, सूत्रसंचालन व भाषा, मुद्रितशोधन, निवेदन, पत्रकारिता अशा अनेक क्षेत्रांत संधी निर्माण झाल्या आहेत. विद्यार्थ्यांना या नवनव्या संधींमधून आपल्या शिक्षणाचे चीज करता यायला हवे. यासाठी ग्रंथालय व पुस्तक यांना मित्र करून विद्यार्थ्यांनी वाचनसंस्कार जोपासायला हवा. उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. बी. डी. अनुसे यांनी आभार मानले.

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ मंगळवार, २ जानेवारी २०१८

## 'उपयोजित मराठी हवे'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'मराठी म्हणजे साहित्य किंवा संस्कार असा दृष्टिकोन न ठेवता वर्तमानाचा विचार करून संधी खुल्या करणारे विषय मराठीच्या अभ्यासक्रमात असायला हवेत, तरच मराठीचा गांभीर्याने अभ्यास करणारे विद्यार्थी तयार होतील,' असे मत महाराष्ट्र साहित्य पत्रिका संपादन मंडळाचे सदस्य आणि तळेगाव दाभाडे महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप सांगळे यांनी व्यक्त केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात 'मराठीतील संधी' या विषयावर ते बोलत होते. उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, डॉ. बी. डी. अनुसे आदी या वेळी उपस्थित होते. मराठीचा अभ्यासक्रम काळानुरूप अधिक व्यावहारिक व उपयोजित व्हायला हवा, असे सांगळे यांनी सांगितले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख